# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या १५१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## गुरुवार, दि. ०२ फेब्रुवारी, २०२३ दुपारी ०५:०० वा.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १५१ वी बैठक गुरुवार, दि.०२ फेब्रुवारी, २०२३ रोजी दुपारी ०५:०० वा. व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - कुलगुरु | अध्यक्षा | उपस्थित |
| २) | डॉ. राजेश गादेवार, प्र-कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. सिद्राम नारायण सलवदे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्रा. डॉ. गौतम सुबण्णा कांबळे | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. उमेश काकडे<br>विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. शैलेंद्र देवळाणकर,<br>मा. प्रभारी शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), पुणे | सदस्य | अनुपस्थित |
| ९) | डॉ. दत्तात्रय व्यंकटराव जाधव<br>मा. सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी,<br>विभागीय कार्यालय, शिवाजी नगर, पुणे. | सदस्य | अनुपस्थित |
| १०) | सीए श्रेणीक शाह - वित्त व लेखा अधिकारी (निमंत्रित) | निमंत्रित | उपस्थित |
| ११) | डॉ. शि. सु. गणपूर<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ (निमंत्रित) | निमंत्रित | उपस्थित |
| १२) | श्रीमती योगिनी घारे - कुलसचिव | सदस्य -सचिव | उपस्थित |

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले. तसेच नव्याने नामनिर्देशित झालेले प्रा. डॉ. गौतम कांबळे व मा. डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा.कुलगुरु महोदया यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

**विषय क्र.१ दि. १३ जानेवारी, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

कुलसचिव यांनी दि. १३ जानेवारी, २०२३ रोजी झालेल्या १५० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविला असता, सर्वानुमते खालील ठराव पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव | **दि. १३ जानेवारी, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला.** |

विषय क्र.२ मा. विभागप्रमुख, मास कम्युनिकेशन विभाग यांनी दि.११/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये श्रमिक पत्रकार संघ आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने एक चर्चासत्र घेण्यास रु.३०,०००/- अनुदान मंजूर करण्याबाबत विनंती केली होती. या अनुषंगाने मा.कुलगुरु महोदयांनी "चर्चासत्र/कार्यशाळा" या आर्थिक तरतूदीमधून तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने अनुदान मंजुर केले आहे. सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.

प्रस्तुत विद्यापीठाकडून दरवर्षी काही अंशी अनुदान संलग्नित महाविद्यालयांना व विद्यापीठ परिसर सर्व विद्यापीठ संकुलांना अभ्यासक्रमावर आधारित कार्यशाळा/चर्चासत्र आयोजनाकरिता "चर्चासत्र/कार्यशाळा" या आर्थिक तरतूदीमधून देण्यात येते. यापूर्वी मास कम्युनिकेशन विभागाने दि.१९/१०/२०२२ रोजी "Writing for Digital Media" या कार्यशाळेचा प्रस्ताव अभ्यासमंडळे विभागास सादर केला होता. सदर प्रस्तावाची नियमानुसार छाननी समितीकडून छांनणी होवून सदर कार्यशाळेस रू.१५,०००/- अनुदान मंजूर करण्यात आले होते. तथापि, मा. विभाग प्रमुख मास कम्युनिकेशन विभाग यांच्या दि.११/१२/२०२२ रोजीच्या विनंतीनुसार अभ्यासमंडळे विभागाने दि.२२/१२/२०२२ रोजी टिपणी सादर केली असता सदर टिपणीवर मा. कुलगुरु महोदयांनी "Writing for Digital Media" या कार्यशाळेसाठी मंजूर झालेले रू.१५,०००/- अधिक रू.१५,०००/- असे एकूण रू.३०,०००/- अनुदानास "चर्चासत्र/कार्यशाळा" या आर्थिक तरतूदीमधून श्रमिक पत्रकार संघ आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित होणाऱ्या चर्चासत्रास खास बाब म्हणून मान्यता प्रदान केली आहे. यानुसार अभ्यासमंडळे विभागाने दिनांक ०७/०१/२०२३ रोजी टिपणी सादर केली असता सदर टिपणीवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मान्यता प्रदान केली आहे. याप्रमाणे दिनांक २२/१२/२०२२ रोजीच्या टिपणीची छायांकित प्रत देवून मास कम्युनिकेशन विभागास कळविण्यात आले आहे.

सबब, मा. विभागप्रमुख, मास कम्युनिकेशन विभाग यांनी दि.११/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये श्रमिक पत्रकार संघ आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने एक चर्चासत्र घेण्यास रू.३०,०००/- अनुदान मंजूर करण्याबाबत विनंती केली होती. या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांनी "चर्चासत्र/कार्यशाळा" या आर्थिक तरतूदीमधून तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने अनुदान मंजुर केले आहे. सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | विभागप्रमुख, मास कम्युनिकेशन विभाग यांनी दि.११/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये श्रमिक पत्रकार संघ आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने एक चर्चासत्र घेण्यास रु.३०,०००/- अनुदान मंजूर करण्याबाबत विनंती केली होती. या अनुषंगाने मा.कुलगुरु महोदयांनी "चर्चासत्र/कार्यशाळा" या आर्थिक तरतूदीमधून तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने अनुदान मंजुर केल्याची नोंद घेण्यात आली. |

**विषय क्र.३ सन २०२२-२३ च्या सुधारीत अर्थसंकल्पास व सन २०२३-२४ च्या मुळ अर्थसंकल्पास मान्यतेची बाब विचारार्थ.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३३(१) नुसार प्रस्तुत विद्यापीठाचे सन २०२२-२३ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२३-२४ चा मूळ अर्थसंकल्प तयार करण्याकरिता समान लेखा संहिता कलम २.१२(i) नुसार मा.कुलगुरु यांचे मान्यतेने खालीलप्रमाणे उपसमिती गठीत करण्यात आली होती.

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील | अध्यक्ष |
| २ | प्रा. डॉ. व्ही. बी. घुटे | सदस्य |
| ३ | डॉ. श्रीमती किर्ती पांडे | सदस्य |
| ४ | सीए श्रेणिक शाह | सदस्य सचिव |

उपरोक्त उपसमितीने दि.२६ ते ३०/१२/२०२२ दरम्यान विविध विभाग/संकुल प्रमुखांसोबत त्यांची मागणी, जमा व खर्चाचे नियोजन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मागील तीन वर्षाची प्रत्यक्ष जमा व खर्च, त्यांची चालू वर्षातील प्रत्यक्ष जमा - खर्च व त्यांची मागणी तसेच पुढील वर्षातील होणारी जमा व खर्चाचे नियोजन व उपलब्ध निधी इ. बाबत आढावा घेण्यात आला व त्यानुसार सद्य:स्थितीत उत्पन्नात होणारी घट तसेच आवर्ती खर्चात वरचेवर होणारी वाढ ही बाब विचारात घेऊन एकूण खर्चात कपात करुन सुधारित व मूळ अंदाजपत्रकीय अंदाज ठरविण्यात आले आहेत व सन २०२२-२३ चा सुधारित व सन २०२३-२४ चा मूळ मसूदा तयार करुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९४(६)(क) नुसार वित्त व लेखा समितीच्या दि.३०/०१/२०२३ रोजी झालेल्या बैठकीसमोर विषय क्र.२ नुसार सादर केला असता, त्यावर सर्वंकष चर्चा होऊन त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव | सन २०२२-२३ च्या सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२३-२४ च्या मूळ अर्थसंकल्पावर सर्वंकष चर्चा होऊन दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करण्यात आली. |

सबब, विद्यापीठाचा सन २०२२-२३ च्या सुधारित अर्थसंकल्प व सन २०२३-२४ च्या मूळ अर्थसंकल्पास वित्त व लेखा समितीने दुरुस्तीसह केलेली मान्यतेची शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१(ज) नुसार विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **सन २०२२-२३ च्या सुधारीत अर्थसंकल्पास व सन २०२३-२४ च्या मुळ अर्थसंकल्पास वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस दुरुस्तीसह स्विकारुन, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१(ज) अन्वये मान्यता देऊन सर्वानुमते अधिसभेस शिफारस करण्यात आली.** |

**विषय क्र.४ दि.०२/०२/२०२३ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.**

विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.०२/०२/२०२३ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

विद्यापीठ परिनियम S. ३३९ (f) नुसार दि.०२/०२/२०२३ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, दि.०२/०२/२०२३ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **दि.०२/०२/२०२३ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

**विषय क्र. ५(१)** **मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये इंटरनेट कनेक्शन उपलब्ध करून घेणे या कामासाठी भारत संचार निगम लि. सोलापूर यांच्याकडून प्राप्त झालेले अंदाजपत्रक विचारार्थ.**

प्रस्तुत विद्यापीठाच्या मौजे कोंडी ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर येथील परिसरात मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवनचे स्थापत्य बांधकामाचे काम अंतिम टप्यात आहे. सद्यस्थितीत सदर इमारतीमध्ये इलेक्ट्रीकल/अग्नीशामक यंत्रणा/लिफ्ट बसविणे इ. या कामासाठीची ई-निविदा प्रक्रिया अंतिम टप्यात आहे. त्यानंतर सदर इमारतीमध्ये इंटरनेट कनेक्शन सुविधा उपलब्ध करावी लागणार आहे. त्यासाठी भारत संचार निगम लि. सोलापूर या कार्यालयामार्फत इंटरनेटची सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी पत्राद्वारे कळविण्यात आले असता, त्यांनी दिनांक २७/०१/२०२३ रोजीच्या ईमेल द्वारे ३०० एमबीपीएस इंटरनेट लिझ लाईन व पीआरआय लाईन करीता एकूण रूपये ३६,६०,०००/-(रूपये छत्तीस लाख साठ हजार फक्त) अधिक जीएसटी १८% इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक सादर केले आहे.

सबब, मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये इंटरनेट कनेक्शन उपलब्ध करून घेणे या कामासाठी भारत संचार निगम लि सोलापूर यांच्याकडून प्राप्त झालेले अंदाजपत्रक विचारार्थ.

| ठराव: | **मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये इंटरनेट कनेक्शन उपलब्ध करून घेणे या कामासाठी भारत संचार निगम लि. सोलापूर यांच्याकडून प्राप्त झालेले अंदाजपत्रक स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

M. Fadnavis

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद